प्रेस नोट 		दिनांक २६/१०/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई |
| २ | गु.र.क्र | ४३/२०२१, |
| ३ | कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | १) श्री रणजितसिंह बंडोबा पवार, ५७ वर्षे, धंदा–नोकरी, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन (म.रा.) कार्यालय, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पुर्व), मुंबई., रा.ठी. बिल्डींग नं. ७ फ्लॅट नं. २६७९ दुसरा माळा, एम.आय.जी. जवळ, पालखी हॉटेलच्या मागे, बांद्रा (मुर्व), मंबई–४०००५१<br>२) श्री. अभिषेक नारायण टिळेकर, वय ३२ वर्षे, रा.ठि. २९/६०९ गुलमोहर सोसासटी टाटा पॉवर हाऊस, मागाठणे बेस्ट बस डेपो जवळ, बोरीवली (पुर्व), पुर्व मुंबई–४०००६६. (खाजगी इसम) |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रूपये ५०,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रूपये ४०,०००/– |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रूपये ४०,०००/– |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे मालाड (पश्चिम) मुबई येथे किराणा दुकान आहे.<br>दिनांक ०६/०९/२०२१ रोजी यातील आलोसे क्र. १ हे आरोपी क्र. २ यांचे सोबत फिर्यादी यांचे दुकानात गेले व त्यांचेकडे फुड लायसन्स बाबत विचारणा करुन त्यांचे दुकानातील बेसन, मैदा व तुरडाळ यांचे सॅम्पल घेवून फिर्यादी यांना नोटीस देवून कारवाई करणार असल्याचे सांगितले, तसेच दुकानावर कारवाई न करण्यासाठी आलोसे क्र. १ यांनी फिर्यादी यांचेकडे रूपये ५०,०००/– लाचेची मागणी केली. तक्रारदार यांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २८/०९/२०२१ रोजी सबंधीत लोकसेवक याचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे लेखी तक्रार अर्ज दिला.<br>त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दिनांक २९/०९/२०२१, ०६/१०/२०२१ व २६/१०/२०२१ रोजी पडताळणी केली असता दि. २६/१०/२०२१ रोजी आलोसे क्र ०१ व खाजगी इसम आरोपी क्र.२ यांनी फिर्यादी यांचेकडे दुकानावर कारवाई न करण्यासाठी रूपये ५०,०००/– लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ४०,०००/– लाचेची रक्कम स्विकरण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर केलेल्या सापळा कारवाईमध्ये आलोसे क्र. १ श्री रणजितसिंह बंडोबा पवार यांचे सांगण्यावरुन त्यांचे समक्ष खाजगी इसम एजंट आरोपी क्र.२ श्री अभिषेक नारायण टिळेकर यांनी लाचेची रक्कम रूपये ४००००/– स्विकारली म्हणून त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

( आबासाहेब पाटील )
सहायक पोलीस आयुक्त
ला.प्र.वि., मुंबई विभाग, मुंबई